... प्रा. लि.
१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०.
☎ (०२०) २४४७३४५९ / २४४६५०६३ • मोबाईल नं. : ८३७८८३६८३१
E-mail : rajhansprakashan1@gmail.com • www.rajhansprakashan

दि. 23 सप्टेंबर2023

**डॉ. छाया महाजन,**

सस्नेह नमस्कार.

स्त्रीला वेढणाऱ्या कौटुंबिक, सामाजिक, मानसिक कुंपणांचा वेध, घेणारी तुमची कादंबरी **डोईचा पदर आला खांद्यावरी...**
संसदेत 'नारीशक्ती वंदन विधेयक' संमत होण्याच्या पार्श्वभूमीवर प्रकाशित व्हावी, हा एक अनियोजित योगायोगच.

'अनुभवांचं भेंडोळं' असलेले 'माणसाचं आयुष्य' धुंडाळणे हे समर्थ साहित्यिक आपल्या साहित्यातून सतत करत असतो. त्या धांडोळ्यातच तुम्हाला स्त्रीजीवनाचे एक टोक गवसले आणि मग त्याचा माग काढत, बोटाला लागलेल्या काही गाठी - निरगाठी - काही उकलत, काही सोडवत, काही तोडत, तर काही तशाच राहू देत -तुम्ही एक वेधक कादंबरी निर्मिलीत. 'मनवा' हे पात्र आणि 'पापणीआडचा पाणपडदा' यासारखे शब्दप्रयोग या खास 'छाया' स्पर्श.

'मनवा'ची निर्मिती तुमच्या नावासारखी. आपली साथ करणारी सावली -
ती असते, तरीही नसते आणि नसते, तरीही दिसते!

या कादंबरीच्या निमित्ताने तुमच्या विचारांशी चर्चा झाल्याच होत्या. आपल्या बोलण्यातही त्यांना संदर्भ येत असे. कादंबरीच्या निमित्ताने झालेला संवाद मलाही समृद्ध करून गेला.

कादंबरीच्या 'प्रार्थनेच्या सुरा'पेक्षा 'खांद्यावर आलेला डोईचा पदर'आशयदृष्ट्या अधिक सयुक्तिक ठरला, असे मला वाटते.

कोणत्याही पुस्तकाचे मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी यांच्याकडे सोपवले की, आम्ही निर्धास्त असतो. साहित्याची उत्तम समज असल्याने पुस्तकाचे आशयसूत्र नेमके पकडण्याचे काम चंद्रमोहनचा कुंचला उत्तम प्रकारे साधतो. चंद्रमोहनचे हे वेगळेपण 'डोईचा पदर...'च्या मुखपृष्ठातूनही साकार झाले आहे.

तुमच्या कुटुंबीयांसाठी आणि सुहृदांसाठी ही कादंबरी म्हणजे
या वर्षीच्या गणेशोत्सवाची 'राजहंसी'भेट ठरावी.
त्या साऱ्यांना सस्नेह नमस्कार.

तुमच्या प्रतिक्रियेची उत्सुक प्रतीक्षा आहे.